देशोन्नती

# उपेक्षितांचे अंतरंग मांडणारा साहित्यिकः अण्णा भाऊ साठे



**प्रा.डॉ.मिलिंद कांबळे**

समुद्रपूरः अण्णाभाऊ साठे यांचा जन्म बकाल अशा मांगवाड्यात झाला ज्या मांगवाड्याला गावकुसा बाहेर परंपरेने ठेवण्यात आले. मग त्या मांगवड्यातील जनतेला ना धर्म ना संस्कृती होती. फक्त कुत्र्या मांजराप्रमाणे त्यांचे जगणे. ऊन ,वाऱ्याला न जुमानता मोकळ्या आभाळाखाली जगत आणि इतरांना जगवत. हाच पिचलेला, भरडलेला ,चिरडलेला बहुजन समाज अण्णाभाऊंच्या लेखणीवर स्वार झाला. आणि आपले व आपल्या समाजाचे

दुःख मांडू लागला. अण्णा भाऊंचा जन्मच मुळी बहुजनांचे दुःख मांडण्यासाठी झाला. त्यांच्या साहित्यातील जनता जीवनाचा आनंद उपभोगीत बसली नसून अनेक हाल अपेष्टा सहन करीत जगणारी आहे. हे सर्व पाहून अण्णा भाऊ साठे यांनी गावगाड्या बाहेर राहणाऱ्या उपेक्षित माणसांचे अंतरंग आपल्या साहित्याच्या माध्यमातून साऱ्या जगाला उलगडून दाखवले म्हणून त्यांना वैश्विक साहित्यिक म्हणता येईलअसे विचार प्रा. डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले.

अण्णाभाऊ साठे जयंती समिती ,गिरड द्वारा अण्णा भाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष अहिव होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील प्रा.डॉ. मिलिंद कांबळे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून बहुजन रयतचे अध्यक्ष अजय डोंगरे तसेच समुद्रपूरचे ठाणेदार संतोष शेगावकर , त्याच बरोबर सतीश गवळी, संदेश आमटे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशस्वी मुंगले हिने केले. त्यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमाची भूमिका विशद केली आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तर अजय डोंगरे यांनी अण्णाभाऊंच्या जीवन कार्यावर सखोल असे चिंतन मांडले. त्याचबरोबर संदेश आमटे यांनी सुद्धा अण्णा भाऊंच्या साहित्यावर प्रकाश टाकला .अध्यक्षीय भाषणात अहिव यांनी अण्णाभाऊंच्या शाहिरीवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहिल धरणे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रफुल कांबळे यांनी मानले .या कार्यक्रमाचे आयोजन अनिल प्रधान, गणेश मुंगले ,श्रावण खंडाळे ,सागर बावणे, शुभम बावणे ,ऋषिकेश बावणे, शुभम बावणे, प्रज्वल बावणे, अजय बावणे ,अंकुश खडसे, अभिषेक खडसे, प्रज्वल डोंगरे ,अर्जुन सिंग अकाली, अमोल पिंजरकर रितिक मुसरे, गौरव बेंदाम, विशाल आस्कर ,आदर्श खडसे, ओमकार खडसे तसेच अशोक डोंगरे, अमोल तेलंग अश्विनी छोले सुधाकर वाघमारे, प्रवीण डोंगरे ,मनोहर डोंगरे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला गिरड गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी प्रचंड गर्दी केली आणि कार्यक्रम आनंदी वातावरणात संपन्न झाला.तालुका प्रतिनिधी

Wardha Edition
Aug 11, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

AnyScanner